**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगानं राजकीय पक्षांचा प्रचार जोमाने सुरु/ विविध पक्षांचे विविध ठिकाणचे जाहीरनामे प्रसिद्ध

- अंबरनाथनगरपरिषदेमधे भाजपात गेलेल्या नगरसेवकांविरुद्ध काँग्रेस कायदेशीर पावलं उचलणार

- सराफा आणि शेअरबाजारात घसरण

**आणि**

- ज्येष्ठ पर्यावरणवादी तज्ज्ञ डॉ माधव गाडगीळ पंचत्वात विलीन

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगानं राजकीय पक्षांचा प्रचार जोमाने सुरु आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे, तसंच काँग्रेचे वेगवेगळे नेते विविध ठिकाणचे प्रश्न लक्षात घेऊन राजकीय पक्ष निवडणूक जाहीरनामे प्रसिद्ध करत आहेत.

राज्यातल्या २९ महानगरपालिकांमधे येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून त्या पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे. हा आदेश महानगरपालिका क्षेत्रांतली केंद्रशासनाची कार्यालयं, निमशासकीय कार्यालयं, सार्वजनिक उपक्रम, बँका आणि तत्सम आस्थापनांमधेही लागू राहील, असं अधिसूचनेत नमूद केलं आहे.

**<><><><><>**

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अहिल्यानगर इथं प्रचारसभा घेतली. अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राजधानीचा ज्या प्रकारे विकास केला तसा अहिल्यानगरचा विकास करू, १६ जानेवारीला शहराच्या ४९२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी देऊ, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा मुंबईच्या जनतेच्या वेदना, संघर्ष आणि आकांक्षांचा जाहीरनामा असल्याचं वंचित बहुजन आघाडीने म्हटलं आहे. महिला, कामगार, तरुण, दलित, अल्पसंख्यक, स्वच्छता कर्मचारी, असंघटित क्षेत्रातले श्रमिक यांचे प्रश्न सोडवण्याचं आश्वासन त्यांनी यात दिलं.

<><><><><>

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आज भाजपाने जाहीरनामा प्रसिद्ध केला. पुढच्या वीस वर्षांत पाणी आणि मालमत्ता करात कोणतीही वाढ केली जाणार नाही, असं आश्वासन यात देण्यात आलं आहे.
भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री गणेश नाईक यावेळी उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिकेत तीन हजार कोटींचा घोटाळा झाला असून गेल्या पाच वर्षांच्या कामाचं ऑडिट करण्याची मागणी चव्हाण यांनी यावेळी केली.

<><><><><>

‘कुंभ पर्वातली अमृत वचन’ या नावाने भाजपानं नाशिक महापालिकेसाठीचा जाहीरनामा आज प्रसिद्ध केला. नाशिकला ग्रीन एनर्जी, सोलर उपक्रम, स्मार्ट डेटा-सिस्टम, ई-गव्हर्नन्स, क्लीन टेक्नॉलॉजी आणि हरित पायाभूत सुविधा यांच्या सहाय्याने शहर म्हणून विकसित करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. नाशिकच्या सर्वांगीण आणि दीर्घकालीन

प्रगतीसाठी आधुनिक शहरी नियोजन, तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा, डिजिटल प्रशासन, हरित ऊर्जा आणि टिकाऊ पायाभूत सुविधा यांचा व्यापक वापर करण्याचा दृढ संकल्प या जाहीरनाम्यात आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग १७-अ मधल्या निवडणुकीला आणि भाजप उमेदवाराचा अर्ज फेटाळणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या आदेशाला आज मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली.अनधिकृत बांधकाम केल्याच्या कारणावरुन भाजपच्या उमेदवाराचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळला होता. या प्रकरणाची पुढची सुनावणी उद्या होणार असून तोपर्यंत या प्रभागातल्या निवडणुकीबाबत कोणतीही कार्यवाही करू नये असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><><>**

भाजपामधे प्रवेश केलेल्या अंबरनाथमधल्या काँग्रेसच्या बारा नगरसेवकांचं सदस्यत्व रद्द करण्यासाठी काँग्रेस कायदेशीर पावलं उचलणार असल्याचं काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी सांगितलं. काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या सदस्यांनी स्वतंत्र गट स्थापन करणं किंवा दुसऱ्या पक्षात प्रवेश करणं हे असंवैधानिक आहे, त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होईल, असं सावंत म्हणाले.

अंबरनाथमधल्या काँग्रेसच्या निलंबित नगरसेवकांना पक्षप्रवेश दिल्यामुळे भाजपाचा दुतोंडी चेहरा उघड झाल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ते **जालना** इथं वार्ताहरांशी बोलतत होते. अंबरनाथमधल्या काँग्रेसच्या बारा नगरसेवकांनी कोणाशाही चर्चा न करता भाजपाशी आघाडी केली,त्यामुळे त्यांना पक्षातून बडतर्फ करण्यात आलं. मात्र, भाजपाने त्यांच्या नगरसेवकांवर

कसलीही कारवाई केली नाही. उलट काँग्रेसच्या नगरसेवकांना पक्षप्रवेश दिला. त्यामुळे त्यांची दुतोंडी भूमिका उघड झाली, असं सपकाळ म्हणाले.

अंबरनाथ नगरपरिषदेतल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित १२ नगरसेवकांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत नवी मुंबईत हा कार्यक्रम झाला.

भाजपासोबत युती केल्यानं काँग्रेसनं काल त्यांचं निलंबन केलं होतं.

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी विकसित भारत जीरामजी योजना केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत आहे. या योजनेविषयी  सातारा  जिल्ह्यातल्या संगम माऊली इथले रहिवासी प्रवीण कोलपे यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया दिली.

**होल्ड बाईट (२० सेकंद)**

**<><><><><>**

अमेरिकेकडून पुन्हा अतिरीक्त आयात शुल्क लादले जाईल, या भीतीनं देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण झाली. दिवसअखेर सेन्सेक्स ७८० अंकांनी घसरुन ८४ हजार १८१ अंकांवर बंद झाला. निफ्टी २६४ अंकांची घसरण नोंदवून २६ हजारांच्या खाली जाऊन २५ हजार ८७७ अंकांवर स्थिरावला. धातू, तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात घसरले.

मुंबईच्या सराफा बाजारात चांदी आज किलोमागे १२ हजार रुपयांनी स्वस्त झाली. त्यामुळं जीएसटीसह एक किलो चांदीसाठी सुमारे २ लाख ४३ हजार रुपये मोजावे लागत होते. सोनं आज किलोमागे सुमारे ९०० रुपयांनी स्वस्त झालं. एक

तोळा २४ कॅरेट तोळा सोन्यासाठी सुमारे १ लाख ३९ हजार रुपये आणि २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३६ हजार रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><>**

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. भारताच्या पर्यावरण विषयक संशोधन आणि संवर्धन धोरणाला आकार देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आपल्या सहा दशकांपेक्षा जास्त वैज्ञानिक कारकिर्दीत, पर्यावरणाबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. पश्चिम घाटातली जैव विविधता वाचवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष आहेत. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(माधव गाडगीळ यांनी पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात जीवशास्त्र या विषयात पदवी मिळवली. त्यानंतर मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर पदवी, आणि १९६९ साली हार्वर्ड विद्यापीठातून पीएचडी केली. हार्वर्ड मध्ये त्यांनी गणितीय पर्यावरणशास्त्र आणि प्राण्यांच्या वर्तनावर काम केलं. भारतात परतल्यावर ते बंगळुरू इथल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या संस्थेत रुजू झाले. संस्थेच्या पर्यावरण विज्ञान केंद्राचे ते संस्थापक होते. निवृत्ती नंतर ते पुण्यातली आघारकर संशोधन संस्था आणि गोवा विद्यापीठातल्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी झाले.*

*गाडगीळ यांनी प्रधानमंत्र्यांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासह अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये काम केलं.*

*पश्चिम घाटातली जैवविधता जपण्यासाठी आणि त्याचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी डॉ.माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालच्या तज्ज्ञ समितीने तयार केलेला 'गाडगीळ अहवाल' महत्वाचा ठरला.*

*जागतिक जैवविविधतेचं आकर्षण केंद्र असलेल्या पश्चिम घाटावरच्या त्यांच्या मोलाच्या कामगिरीबद्दल, २०२४ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी गाडगीळ यांना 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरण क्षेत्रासाठीचा हा सर्वोच्च सन्मान आहे.*

*गाडगीळ यांनी 'धिस फिशर्ड लँड' आणि 'इकॉलॉजी अँड इक्विटी' यासारख्या प्रभावी पुस्तकांचं लेखन आणि सह-लेखन केलं. त्यांचे २५० पेक्षा जास्त शोध-निबंध प्रकाशित झाले आहेत. डॉ. माधव गाडगीळ यांना भारत सरकारने १९८१ मध्ये पद्मश्री आणि २००६ मध्ये पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. तसंच शांती स्वरूप भटनागर पुरस्कार, व्होल्वो पर्यावरण पुरस्कार आणि पर्यावरण क्षेत्रातल्या कामगिरीसाठी टायलर पुरस्कार यासारख्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.)*

माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये बक्षीस मिळणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सदर जखमी व्यक्तीला रोखरहित उपचार दिले जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**